महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ❖ २३ मार्च २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक २६५ ❖ पाने – ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

## मुंबई विद्यापीठाचा

# विद्यार्थी केंद्रीत अर्थसंकल्प अधिसभेत मंजूर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : गुणवत्ता, सर्वासमावेशकता आणि उत्कृष्टतेला प्राधान्य देत मुंबई विद्यापीठाचा २०२५- २६ या वित्तीय वर्षाचा रुपये ९६८.१८ कोटींचा अर्थसंकल्प आजच्या अधिसभेत मंजूर करण्यात आला. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या या अधिसभेत यावर्षीचा अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला. यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये रुपये १४७ कोटी ६३ लाखांची तूट दाखविण्यात आली आहे. २०२५-२६ वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये संशोधन आणि नाविन्यपूर्ण संस्कृतीच्या बळकटीकरण, उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयकरण आणि वैश्विक नागरिकत्व शिक्षणासाठी पुढाकार, विद्यार्थी सहाय्य आणि प्रगती उपक्रम, माजी विद्यार्थी कनेक्ट आणि विद्यापीठ-औद्योगिक साहचर्य उपक्रम यासह शैक्षणिक आणि गव्हर्नंस उत्कृष्टता उपक्रमांसाठी ७५ कोटींची भरीव तरतूद या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये विविध नाविण्यपूर्ण योजनांसह अनेक विकासकामांना प्राधान्य देण्यात आले आहे. वित्तीय वर्ष २०२५-२६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र, प्रा. बाळ आपटे दालन आणि सभागृह, स्कूल ऑफ लॅंग्वेजेस इमारत दुसरा टप्पा, अवेस्ता पहलवी अभ्यास केंद्र, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी वसतिगृह दुसरा टप्पा, मुलींचे वसतिगृह, वेंगुर्ले येथील सागरी अध्ययन केंद्र आणि तृतीय आणि चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे निवासी संकुल व सामुदायिक सभागृह अशा अनुषंगिक विकासकामांना प्राधान्य देत १३५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. शैक्षणिक वर्गवारीतील सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार, सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार, विद्यापीठ विभाग रँकिंग, शैक्षणिक ऑडिट पोर्टल आणि रँकिंग फ्रेमवर्क, प्रतिष्ठित प्राध्यापकांची व्याख्याने, कुलगुरू योजना, ई-सामग्री विकास आणि महा-स्वयमसाठी शिक्षकांचे प्रशिक्षण, राज्य आणि राष्ट्रीय आंतर-विद्यापीठ/संस्थात्मक सहयोग आणि संबंध (विद्यार्थी/शिक्षक विनिमय, संयुक्त संशोधन कार्यक्रम, ट्विनिंग/जॉइंट/ड्युअल डिग्री प्रोग्राम),



स्कूल कनेक्ट आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणी (प्रशिक्षण, जागरूकता कार्यशाळा, डिजिटलायझेशन इ.), बीकेएस (भारतीय ज्ञान प्रणाली) सेल, अध्यापन-शिक्षण-मूल्यांकनामध्ये एआय सहाय्य/सक्षम/निर्देशित प्रणाली आणि तंत्रज्ञानाचा वापर अशा शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी रुपये १० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

संशोधन आणि नाविन्यपूर्ण संस्कृतीच्या बळकटीकरणावर भर देत संशोधन विकास कक्ष, केंद्रीय संशोधन, उपकरणे आणि डिजिटलायझेशन सुविधा, सर्वोत्कृष्ट संशोधक आणि नवोपक्रम पुरस्कार, संशोधक आणि नवकल्पनांसाठी प्रोत्साहन, अविष्कार विजेत्यांना प्रोत्साहन आणि स्टार्ट-अप उपक्रमांना सहाय्य, नोबेल विजेत्यांची व्याख्यानमाला, बौद्धिक संपदा अधिकारांना प्रोत्साहन, ग्लोबल इनिशिएटिव्ह, मोबाईल टेक्नॉलॉजी आणि इनोव्हेशन प्रात्यक्षिक व्हॅन, क्रिटिकल आणि इमर्जिंग टेक्नॉलॉजीज (प्रगत संगणन आणि सेमीकंडक्टर्स, प्रगत साहित्य आणि नॅनोटेक्नॉलॉजी, क्वांटम माहिती विज्ञान आणि तंत्रज्ञान, अनुवांशिक अभियांत्रिकी, सायबर सुरक्षा, महासागर संशोधन, शाश्वत शेती, विषाणूशास्त्र, हवामान अनुकूलता विकास, आणि कार्यक्षमता संशोधनाला प्रोत्साहन, आरोग्यसेवा, स्मार्ट शहरे, स्मार्ट गतिशीलता आणि वाहतूक विषयांवरील संशोधनाला चालना देण्यासाठी १५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्याचबरोबर विद्यार्थी सहाय्य आणि प्रगती उपक्रमांसाठी ५ कोटींची तरतूद करण्यात आली असून यामध्ये सिंगल विंडो सिस्टीम आणि स्टुडंट हेल्पडेस्क, लर्नर सपोर्ट सिस्टीम, समान संधी सेल, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य, ट्रान्सजेंडर विद्यार्थ्यांसाठी सुविधा, युनिव्हर्सल ह्युमन व्हॅल्यू सेल, सुवर्ण पदके आणि मेरिट अवॉर्ड्स/स्कॉलरशिप मध्ये वाढ अशा योजनांचा समावेश आहे. माजी विद्यार्थी कनेक्ट आणि विद्यापीठ-औद्योगिक साहचर्य उपक्रमासाठी रुपये ५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या उद्देश्याने उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयकरण आणि वैश्विक नागरिकत्व शिक्षणासाठी पुढाकार घेत विद्यापीठाने या वित्तीय वर्षात रुपये ५ कोटींची तरतदू केली आहे. ज्यामध्ये राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विद्यार्थी समर्थन आणि लिंकेजसाठी केंद्र, परदेशी विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी आणि नावनोंदणीसाठी सिंगल विंडो सिस्टीम, रँकिंग आणि ब्रँडिंग उपक्रम, जागतिक दर्जाच्या विद्यापीठांसह सहयोग आणि संबंध (विद्यार्थी/आणि फॅकल्टी एक्सचेंज, संशोधन भागीदारी, स्टडी अब्रॉड प्रोग्राम/इंटर्नशिप, ट्विनिंग/जॉइंट/ड्युअल डिग्री प्रोग्राम, क्रेडिट ट्रान्सफर मेकॅनिझम अशा अनुषंगिक उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे शासन (गव्हर्नंस) गुणवत्ता, सर्वसमावेशकता आणि उत्कृष्टतेला प्राधान्य देण्यासाठी विद्यापीठाने रुपये ३५ कोटींची भरीव तरतूद या अर्थसंकल्पात केली आहे. विकसित भारत @ २०४७ च्या अनुषंगाने विद्यापीठाचा पुढाकार, अमृतकाळाच्या पूर्वसंध्येला नाविन्यपूर्ण कार्यक्रम, जागतिक दर्जाचे विद्यापीठ म्हणून मुंबई विद्यापीठाचा मास्टर प्लॅन, कार्बन न्यूट्रल ग्रीन कॅम्पस उपक्रम, फोर्ट, विद्यानगरी आणि इतर उपपरिसरांतील पायाभूत सुविधांचे अद्ययावतीकरण, व्हिसी फेलो, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी कल्याणकारी उपक्रम, महिला कल्याण योजना, क्रीडा सुविधेचे ऑलिम्पिक मानकांमध्ये सुधारणा, दिव्यांग स्नेही कॅम्पस, वारसा संवर्धन, विद्यार्थी भवनाचे बांधकाम, आरोग्य केंद्राचे अपग्रेडेशन, डिजिटल उपक्रम: पेपरलेस गव्हर्नन्स, डिजिटल लायब्ररी, रेकॉर्ड/हस्तलिखितांचे डिजिटायझेशन, डेटा सेंटरचे क्लाउड बेस्ड सिस्टममध्ये अपग्रेडेशन, व्ही.सी. फेलो, सर्वोत्तम प्रशासकीय विभाग: सामान्य प्रशासन, परीक्षा, वित्त, महाविद्यालयीन कर्मचारी-शहरी आणि ग्रामीण, सर्वोत्कृष्ट सिनेट सदस्य, सर्वोत्कृष्ट विद्या परिषद सदस्य यासाठी पुरस्कार, युनिव्हर्सिटी सोशल रिस्पॉन्सिबिलिटी सेल (USRC) ज्यामध्ये शेतकरी, ज्येष्ठ नागरिक, समुदाय सहभाग, रक्तदान अशा अनुषंगिक बाबींचा समावेश असलेला सर्वसमावेशक अर्थसंकल्प अधिसभेने मंजूर केला.

अशा प्रमुख ठळक वैशिष्ट्यांवर आधारीत वित्तीय वर्ष २०२५-२६ चा रुपये ९६८.१८ कोटींचा अर्थसंकल्प सीए. हर्षल वाघ, वित्त व लेखा अधिकारी यांनी मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्राचार्य. डॉ. अजय भामरे, कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे, यांच्या उपस्थितीत अधिसभेच्या मान्यवर सदस्यांसमोर सादर केला. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्या आदेशान्वये विद्यापीठाने या वर्षीचा अर्थसंकल्प तयार करण्यासाठी विद्यापीठ उपपरिसर, विद्यापीठ विभाग व आंतरविद्याशाखा अभ्यास मंडळ, आजीवन अध्ययन व विस्तार मंडळ, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, माहिती व तंत्रज्ञान मंडळ आणि अधिष्ठाता आणि सहयोगी अधिष्ठाता या सर्वांचे सक्रीय सहभाग आणि मौलिक मार्गदर्शन लाभले.

### वार्षिक लेखे अहवाल आणि वार्षिक अहवाल अधिसभेत मंजूर सादर

मे. किशोर अँड कंपनी (सी.ए.) यांनी सादर केलेले मुंबई विद्यापीठाचे सन २०२२-२३ चे वार्षिक लेखे, ३१ मार्च २०२३ चा ताळेबंद व लेखापरीक्षण अहवाल आज पार पडलेल्या अधिसभेत मंजूर करण्यात आला. तसेच शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ चा मुंबई विद्यापीठाचा वार्षिक अहवाल अधिसभेत मंजूर करण्यात आला.

### २०२५-२०२६ नाविन्यपूर्ण योजना/उपक्रम

- गुणवत्ता, सर्वसमावेशकता आणि उत्कृष्टता शैक्षणिक उपक्रम १० कोटी
- संशोधन आणि नाविन्यपूर्ण संस्कृतीच्या बळकटीकरणासाठी पुढाकार १५ कोटी
- विद्यार्थी सहाय्य आणि प्रगती उपक्रम ५ कोटी
- माजी विद्यार्थी कनेक्ट आणि विद्यापीठ-औद्योगिक साहचर्य उपक्रम ५ कोटी
- उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयकरण आणि वैश्विक नागरिकत्व शिक्षणासाठी पुढाकार ५ कोटी
- गुणवत्ता, सर्वसमावेशकता आणि उत्कृष्टता गव्हर्नंस उपक्रम ३५ कोटी

### २०२५-२०२६ या वर्षामधील नियोजित बांधकामे

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र– रुपये १५ कोटी
- तृतीय व चतूर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे निवासी संकूल व सामुदायिक सभागृह– रुपये ५० लाख
- प्रा. बाळ आपटे दालन – रुपये २५.९१ कोटी
- स्कूल ऑफ लॅंग्वेजेस इमारत (२ रा टप्पा), अवेस्ता पहलवी अभ्यास केंद्र – रुपये १४ कोटी
- आंतरराष्ट्रीय विद्यार्थी वसतिगृह (२ रा टप्पा) – रुपये ५० लाख
- मुलींचे वसतिगृह ८ कोटी ५ लाख
- वेंगुर्ला उपपरिसराचा विकास – रुपये १.०० कोट

# संशोधनातून रचनात्मक कार्य घडते - डॉ नंदकिशोर चंदन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

खर्डी : जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खर्डी येथे आज एक दिवसीय राज्यस्तरीय संशोधन कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेचे उद्घाटन श्री रविंद्र घोडविंदे सर अध्यक्ष जीवनदीप शैक्षणिक संस्था यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी संशोधनाचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. ही कार्यशाळेच्या दुस-या सत्रात डॉ नंदकिशोर चंदन ( प्राध्यापक व विभागप्रमुख सिध्दार्थ महाविद्यालय मुंबई)



यांनी विद्यार्थ्यांना संशोधन पध्दतीशास्त्राचा सविस्तर परिचय करून दिला तसेच ऑक्सफर्ड विद्यापीठतील त्यांचे संशोधनाचे अनुभव सांगून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. तद्नंतर डॉ कुलदीप राठोड ( वाणिज्य विभाग बी.एन.एन महाविद्यालय) यांनी विद्यार्थ्यांना संशोधनचौर्य म्हणजे काय ? हे समजून सांगून संशोधन करत असताना कोणती काळजी घेतली पाहिजे याविषयी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. तद्नंतर डॉ निलेश जाधव ( रसायनशास्त्र विभाग ,किन्वहली महाविद्यालय) यांनी विद्यार्थ्यांना संशोधनाचे लेखनशास्त्र व प्रसिद्धी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.डॉ दिपक वायाळ ( नेस वाडिया महाविद्यालय पुणे) यांनी विद्यार्थ्यांना संशोधकाचे मूल्य व संशोधनास सहाय्यक असणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. या कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी डॉ के बी कोरे, श्री प्रशांत घोडविंदे व प्राचार्य कैलास कळकटे उपस्थित होते. या कार्यशाळेचे प्रास्ताविक प्रा सोनम मोरे यांनी केले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा वैष्णवी साळुंखे यांनी केले. तर आभार प्रा विशाल भोसले यांनी मानले. कार्यशाळेचे समन्वयक म्हणून प्रा सोनम मोरे व प्रा रोहन निळे यांनी जबाबदारी पार पाडली. या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंदांने मेहनत घेतली. या कार्यशाळेमध्ये जवळपास १२५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

# मुंबईत पहिली ई-वॉटर टॅक्सी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई – मुंबईकरांची ई-वॉटर टॅक्सीबाबतची उत्सुकता लवकरच संपणार असून, देशातील पहिली ई-वॉटर टॅक्सी मुंबईत सुरू होणार आहे. स्वीडनची कँडेला कंपनी पर्यावरणपूरक वॉटर टॅक्सीचा पायलट प्रोजेक्ट राबवणार असून, ही सेवा लवकरात लवकर सुरू करण्याच्या सूचना मत्स्य व्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी स्वीडनचे महावाणिज्यदूत स्वेन ओस्टबर्ग यांना दिल्या. आज मंत्रालयात मंत्री राणे



आणि महावाणिज्यदूत ओस्टबर्ग यांच्यात ई-वॉटर टॅक्सी प्रकल्पावर सविस्तर चर्चा झाली. यावेळी ओस्टबर्ग यांचे सल्लागार सलोनी झव्हेरी आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मंत्री राणे यांनी सांगितले की, मुंबईतील प्रचंड वाढलेल्या वाहतूक ताणामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ई-वॉटर टॅक्सी लवकर सुरू होण्यासाठी आग्रही आहेत. गेटवे ऑफ इंडिया ते एलिफंटा आणि गेटवे ऑफ इंडिया ते अलिबाग या जलवाहतूक मार्गांवर पायलट प्रोजेक्ट राबविण्यात येणार आहे. त्यामुळे मुंबईतील वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटण्यास मदत होईल. स्वीडनच्या कँडेला कंपनीसोबत झालेल्या करारानुसार, त्यांनी नागरिकांची सुरक्षितता, पर्यावरणपूरक तंत्रज्ञान आणि वॉटर टॅक्सीच्या परवडणाऱ्या भाडेदरांवर भर द्यावा, असे निर्देश मंत्री राणे यांनी दिले. तसेच, कंपनीला आवश्यक असलेल्या परवान्यांसाठी राज्य सरकार त्वरित निर्णय घेईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. महावाणिज्यदूत ओस्टबर्ग यांनी महाराष्ट्रातील बंदरांच्या विकासात स्वीडनला रस असल्याचे सांगितले. यावर मंत्री राणे यांनी मुंबईतील ससून डॉकचे मॉडेल पोर्ट म्हणून विकसित करण्याची सूचना केली. स्वीडनच्या कंपन्यांनी राज्य सरकारला पोर्ट विकासासाठी प्रस्ताव सादर करावा, तसेच वाहतुकीसाठी योग्य स्थळांची पाहणी करून देशातील आघाडीचे मॉडेल पोर्ट उभारावे, असे निर्देश त्यांनी दिले. यासाठी मेरीटाईम बोर्डाशी चर्चा करून एप्रिलमध्ये पाहणी अहवाल सादर करण्याचे आदेश मंत्री राणे यांनी दिले. स्वीडनच्या प्रतिनिधींनीही पोर्टच्या विकास, स्वच्छता, सोयीसुविधा आणि गुंतवणुकीसंदर्भात आपली भूमिका स्पष्ट केली.

# दहिवलीच्या शेतकऱ्यांना कृषी विभागाची समर्थ साथ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण: ऐकमेका साह्य करु, अवघे धरु सुपंथ,या संत तुकाराम महाराजांच्या सुंदर वचनाप्रमाणे गरजूंना आपणाकडून जेजे शक्य होईल ती ती मदत केली पाहिजे, मात्र मदत करताना आर्थिक हितसंबंध येता कामा नये याची काळजी घेतली पाहिजे, आपण केलेली एक किरकोळ मदत समोरील व्यक्ती च्या जीवनात बदल घडवून आणू शकते,नेमकी अशीच घटना कल्याण तालुक्यातील अडिवली -दहिवली शेतकऱ्यांच्या बाबतीत घडली आहे, तेही कल्याण पंचायत समितीच्या कृषी विभागाच्या सहकार्याने, त्याला मिळालेल्या शेतकऱ्यांच्या समर्थ साथीने, कष्टाने, जिद्दीने!,आज ऐन कडक उन्हाळ्यात या गावातील ३० ते ४० एकर क्षेत्र हिरवेगार झाले आहे, नदी, धरण, तलाव आमच्या उशाला, आणि कोरड



पडली घशाला, अशी ओरड आपण नेहमीच ऐकतो, पण यासाठी प्रत्यक्षात कृती करताना, त्याची अमंलबजावणी करताना दिसत नाही, परंतु याला अपवाद ठरली ती कल्याण पंचायत समिती मधील अडिवली, दहिवली ग्रामपंचायत!येथील ऐन विशीतील तरुण सरपंच कमलाकर राऊत, उपसरपंच दर्शन मलिक, सदस्य सोमनाथ सांवत, सुनिता राऊत, दामिनी जाधव, सुखदेव शिद, मिना फसाले, इंदिरा शिद, इत्यादीनी,तडक कल्याण पंचायत समिती गाठली, आणि आपले दु:ख, कृषी विभाग, गटविकास अधिकारी, यांच्या समोर मांडले, तरुण लोकप्रतिनिधी ची गावाप्रती, शेतकऱ्यांप्रती, तळमळ, महत्वकांक्षा, कष्ट करण्याची जिद्द, पाहून ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, अतिरिक्त सीईओ, अजिंक्य,पवार,जिल्हा कृषी विकास अधिकारी,मुनीर बाचोटीकर,जि, प ठाणे, कल्याण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी,संजय भोये, यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी अधिकारी, बाबासाहेब शिंदे, एस एस संत, श्री घोलप, आदींनी या गावास भेटी देऊन, शेतकऱ्यांच्या बैठका घेऊन, प्रत्यक्षात काळू नदीवर जाऊन, गावातील१२ते १३शेतकऱ्यांना एकत्र करून प्रती शेतकऱ्यांला ३०हजार रुपये असे सुमारे३लाख ९०हजार रुपये अनुदान देऊन तब्बल८००ते१हजार मीटर पाईपलाईन काळूनदीवरुन करून पाणी शेतावर आणले, याचा परिणाम, गेली कित्येक वर्षे केवळ भात पिक घेणारे शेतकरी, आता काकडी, चवळी, दुधी भोपळा, मिरची, सिमला, गोसाळी, कारली,अशी वेग वेगळी भाजीपाला पिके घेऊ लागली, कल्याण सारखी मोठी बाजारपेठ जवळ असल्याने आता या शेतकऱ्यांना जवळपास७०/८०हजार केवळ नफा मिळत आहे, वर्षानुवर्षे ओसाड माळरानावर आता हिरवेगार नंदनवन फुलंल आहे, शासकीय अधिका-यांनी ठरवलं, आणि त्याला, नागरिकांची,शेतकऱ्यांची,जनतेची साथ लाभली तर काय?होऊ शकते, याचे ताजे व जिवंत उदाहरण म्हणजे, अडिवली, दहिवली, ग्रामपंचायत होय! नुकतीच या गावाला, कल्याण पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी आर के गवारी, कृषी अधिकारी बाबासाहेब शिंदे, एस एस संत, विस्तार अधिकारी दिनेश घोलप, पत्रकार संजय कांबळे, आदींनी भेट दिली, यावेळी,ग्रामपंचायत अधिकारी श्रीमती माधुरी रोठोड,,उपसरपंच,दर्शन मलिक, जागृती जाधव, दिपाली ठाकरे,राजाराम राऊत, सुभाष सावंत,आदी मंडळी उपस्थित होते, यावेळी गावातील विविध विकास कामे, अंगणवाडी, इत्यादींची पाहणी करण्यात आली



# गीतासार



अध्याय ५
**कर्मसंन्यासयोगः**

ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते । आद्यन्तवन्तः कौन्तेय न तेषु रमते बुधः ॥ ५-२२ ॥

जे हे इंद्रिय आणि विषय यांच्या संयोगाने उत्पन्न होणारे सर्व भोग आहेत, ते जरी विषयी पुरुषांना सुखरूप वाटत असले तरी तेही दुःखालाच कारण होणारे आणि अनित्य आहेत. म्हणून हे कुंतीपुत्र अर्जुना, बुद्धिमान विवेकी पुरुष त्यात रमत नाहीत. ॥ ५-२२ ॥

शक्नोतीहैव यः सोढुं प्राक्शरीरविमोक्षणात् । कामक्रोधोद्भवं वेगं स युक्तः स सुखी नरः ॥ ५-२३ ॥

जो साधक या मनुष्यशरीरात शरीर पडण्याआधीच काम-क्रोध यांमुळे उत्पन्न होणारा आवेग सहन करण्यास समर्थ होतो, तोच योगी होय आणि तोच सुखी होय. ॥ ५-२३ ॥

योऽन्तः सुखोऽन्त रारामस्तथान्त ज्योतिरेव यः । स योगी ब्रह्मनिर्वाणं ब्रह्मभूतोऽधिगच्छति ॥ ५-२४ ॥

जो पुरुष अंतरात्म्यातच सुखी, आत्म्यातच रमणारा आणि आत्म्यातच ज्ञान मिळालेला असतो, तो सच्चिदानंदघन परब्रह्म परमात्म्यासह ऐक्यभावाला प्राप्त झालेला सांख्ययोगी शांत ब्रह्माला प्राप्त होतो. ॥ ५-२४ ॥

लभन्ते ब्रह्मनिर्वाणमृषयः क्षीणकल्मषाः । छिन्नद्वैधा यतात्मानः सर्वभूतहिते रताः ॥ ५-२५ ॥

ज्यांचे सर्व पाप नष्ट झाले आहे, ज्यांचे सर्व संशय ज्ञानामुळे फिटले आहेत, जे सजीवमात्रांच्या कल्याणात तत्पर आहेत आणि ज्यांचे जिंकलेले मन निश्चलपणे परमात्म्यात स्थिर असते, ते ब्रह्मवेत्ते शांत ब्रह्माला प्राप्त होतात. ॥ ५-२५ ॥

## रेसिपी
# कैरीची भाजी



साहित्य
1 मोठी कैरी (आंबटसर)
2 चमचे गूळ (चिरून)
1 ते 2 चमचे हळद
1 चमचा लाल तिखट
1 चमचा मोहरी
1 ते 2 चमचे जिरे
1 ते 4 चमचे हिंग
1 ते 2 हिरव्या मिरच्या (चिरून)
7 ते 8 कढीपत्ता पाने
1 ते 2 चमचे धणेपूड
1 ते २ चमचे जिरेपूड
1 चमचा तेल
मीठ चवीनुसार
1 ते 2 कप पाणी

कृती
सर्वात प्रथम कैरी धुवून सोलून त्याचे लहान तुकडे करून घ्या.
कढईत तेल गरम करून त्यात मोहरी, जिरे, हिंग आणि कढीपत्ता घाला.
आता त्यामध्ये हिरव्या मिरच्या घालून परतून घ्या.
हळद, लाल तिखट घालून लगेच कैरीचे तुकडे घाला.
मीठ आणि गूळ घालून 2-3 मिनिटे परतून घ्या.
पाणी घालून झाकण ठेवून मध्यम आचेवर 5-7 मिनिटे शिजवा.
कैरी मऊ झाल्यावर धणेपूड आणि जिरेपूड घालून परता.
भाजी मस्त घट्टसर झाली की गॅस बंद करा.
ही आंबटगोड कैरीच्या भाजीचा आस्वाद गरमागरम भाकरी, पोळी किंवा वरण-भातासोबत घेऊ शकता.

तेथे कर माझे जुळती

# हुतात्मा सूर्यकुमार सेन जयंती

वधस्तंभाकडे नेतांनाही "वंदे मातरम् " घोषणा देणाऱ्या व ब्रिटीशांच्या विरोधात क्रांतिकार्य करणाऱ्या सूर्यसेन यांच्या स्मृतिदिना निमित त्यांचा परिचय करून घेऊ या . बंगालमधील चितगाव जिल्ह्यातील नोआपारा येथे सूर्यकुमार सेन यांचा दिनांक 22 मार्च १९९४ रोजी जन्म झाला . (आता चितगाव बांगला देशात आहे . ) त्यांच्या वडिलांचे नाव रामनिरंजन सेन व आईचे नाव शिला बाला देवी असे होते. सन१९१६ मध्ये ते बेहरामपूर कॉलेज (आताचे एमईएस कॉलेज ) येथून बीए झाले होते . महाविद्यालयात असतांना त्यांच्या मनावर राष्ट्रवादी विचारांचा प्रभाव पडला होता . महाविद्यालयीन शिक्षण घेतांना त्यांची क्रांतिकारी अध्यापक सतीशचंद्र चक्रवर्ती यांच्याशी गाठ पडली. ' युगांतर ' या क्रांतिकारी संस्थेचे ते सदस्य होते . चक्रवर्ती यांच्या सहवासात प्रेरित होऊन सूर्यकुमार सेन क्रांतिकारी बनले . पुढे १९१७ साली बी . ए .झाल्यानंतर सूर्यकुमार उमा तारा हायस्कूल येथे गणिताचा शिक्षक म्हणून काम करू लागले . दरम्यान पुष्पा सेन यांच्याशी त्यांचा विवाह झाला. त्यांच्या मनात केवळ क्रांतिचेच विचार होते .त्यामुळे घर-संसार या गोष्टी त्यांना तुच्छ वाटत होत्या .

सन१९१९ मध्ये घडलेल्या जालियनवाला बाग हत्याकांडाची बातमी सर्वत्र पसरली . सदर हत्याकांडाचा जाहीर निषेध करण्याचे सूर्यकुमार यांनी ठरविले . त्यांनी उघड -उघड सत्याग्रह हा मार्ग पत्करला . क्रांतिकारी कार्यात चितगाव येथे तैनात असलेल्या ब्रिटिश सैन्याविरुद्ध त्यांनी लढा दिला. असहकार



चळवळीत त्यांनी विद्यार्थ्यांची गुप्त समिती स्थापन केली होती. त्या समितीचे नाव साम्यावस्था असे होते. सक्रीय सहभागी होऊन लढा दिला. म्हणून १९२६ ते १९२८ पर्यंत वर्षे त्यांना तुरुंगवास भोगावा लागला.

चितगावच्या छाप्यानंतर १८एप्रिल १९३० रोजी एका भयंकर युद्धात सूर्यसेन यांनी ब्रिटीश सरकारी कर्मचारी व मालमतेवर हल्ले केले. त्यांचा शस्त्र साठा पळविला. पोलिसांना ते गुंगारा देऊन क्रांतिकार्य करीत असत . ब्रिटिश सरकारने त्यांच्यावर १४००० रुपयांचे इनाम जाहीर केले. सतत ४ वर्षे सूर्यकुमार पळत राहिले. पोलीस सतत त्यांचा पाठलाग करत होते. शेवटी लष्करी फौज त्यांना शोधण्यासाठी पाठविण्यात आली. एकूण दहा वेळा पोलिसांच्या तावडीतून निसटणाऱ्या सेनमास्टर दा यांना एका विश्वास घातकी नराधमाने पकडून दिले.

१६ फेब्रुवारी १९३३ रोजी त्यांना अटक करण्यात आली. त्यांचे सहकारीही पकडले गेले . खटला चालवण्यात आला . शेवटी त्यांना फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली . त्यांच्या फाशीची वेळ ब्रिटीश सरकारने रात्री बाराची ठेवली . "वंदे मातरम् "घोषणा देतो म्हणून इंग्रजांनी त्यांचा जबडा तोडला आणि हाताची नखेही उपटली. सूर्यसेन यांनीअत्याचार सहन केले. ब्रिटिशांनी निर्दयतेच्या सर्व मर्यादा ओलांडल्या . अभिमानाची बाब म्हणजे हा क्रांतिसूर्य त्यांना शरण गेला नाही . पोलिसांनी मास्टरदा सूर्यसेन यांना फाशीसाठी नेतांना देखील लाथा बुक्क्यांनी ते बेशुद्ध पडेपर्यंत मारले . त्याच अवस्थेत त्यांना फाशी देण्यात आली . तो दिवस होता १२ जानेवारी १९३४ चा ! धन्य तो हुतात्मा !!



डॉ. आनंदराव सूर्यवंशी

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम
# रायगड जिल्ह्याची १०० टक्के उद्दिष्ट पूर्ती

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : राज्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना स्वत:चा उद्योग व्यवसाय सुरु करण्याकरीता असलेल्या राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत जिल्हा उद्योग केंद्र,रायगड करीता प्राप्त 600 प्रकरण उद्दीष्टांची जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे निर्देशन व मार्गदर्शनाने 100 टक्के पूर्तता केली असल्याची माहिती जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी. एस. हरळय्या यांनी दिली आहे.

रायगड जिल्ह्यातील बँक ऑफ इंडिया, स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, युनियन बँक ऑफ इंडिया, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., इ. अलिबाग या सार्वजनिक व सरकारी बँकानी त्यांना दिलेले उद्दीष्ट विहित वेळेत पूर्ण केल्याने चालू आर्थिक वर्षात योजनेंतर्गत जिल्हा उद्योग केंद्राची उद्दीष्टपूर्ती पूर्ण झालेली आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सर्वांचे अभिनंदन केले असून भविष्यात देखील रायगड जिल्हा आघाडीवर ठेवण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

सुशिक्षित बेरोजगारांनी स्वत:चा उद्योग व्यवसाय सुरु करण्याकरीता राज्य शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम व केंद्र शासनाच्या पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम या योजनेत जिल्ह्यातील सर्व बँकाचा सकारात्मक दृष्टीकोन आहे. या सर्व योजनांचा लाभ जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतीने घ्यावा, असे आवाहन श्री.हरळय्या यांनी केले आहे.

# मुलांनी घेतले चिमणी संवर्धनाचे धडे

## जागतिक चिमणी दिनानिमित्त आंतरशालेय जिल्हास्तरीय चिमणी संवर्धन स्पर्धा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : स्पॅरोताई फाऊंडेशनचे संस्थापक व संस्थापिका डॉ. राज परब व डॉ. ज्योती परब यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'चिमणी वाचवा, निसर्ग वाचवा', या चिमणी संवर्धन मोहिमे अंतर्गत २० मार्च जागतिक चिमणी दिनाचे औचित्य साधून माझ्या चिऊताईसाठी घरकुल किंवा माझ्या चिऊताईसाठी फिडर बनविणे अशा सांघिक स्वरूपाच्या स्पर्धा इ.५वी ते ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'आंतरशालेय जिल्हास्तरीय चिमणी संवर्धन स्पर्धा २०२५' याचे आयोजन १८ मार्च २०२५ रोजी निसर्ग परिचय केंद्र, टिकुजीनी वाडी, ठाणे (पश्चिम) येथे करण्यात आले होते. यावेळी ठाणे व मुंबई जिल्ह्यातील जवळजवळ ५० शाळेतील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये सहभाग घेतला. तसेच विद्यार्थामध्ये चिमणीबद्दल जागरूकता वाढावी यासाठी चिमणीवर आधारित प्रश्नमंजुषेचे आयोजन करून विद्यार्थ्यांना उत्स्फुर्त बक्षिसे वाटण्यात आली. त्यामुळे एकूणच स्पर्धेचे वातावरण चिमणीमय झाले. परीक्षक समितीप्रमुख संजय काशीद व उर्मिला शिंपी या परीक्षकांनी दोन्ही स्पर्धाचे त्यांच्या सहकाऱ्यांसोबत सकारात्मक परिक्षण केले. चिऊताई साठी घरटे या स्पर्धेत ज्ञानोदय विद्या मंदिर हिंदी माध्यम प्रथम क्रमांक, श्री इंग्लिश स्कूल आणि जूनियर कॉलेज द्वितीय क्रमांक, हरिओम इंग्लिश स्कूल तृतीय क्रमांक, उत्तेजनार्थ छत्रपति



शिवाजी विद्यालय मराठी माध्यम यांना तर माझ्या चिऊताई साठी फीडर या स्पर्धेत यशोधन इंग्लिश स्कूल प्रथम क्रमांक,श्रीमती सावित्री देवी थिरानी विद्या मंदिर द्वितीय क्रमांक, रामकृष्ण विद्या मंदिर तृतीय क्रमांक तर गणेश विद्यालय माध्यमिक विभाग उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले. विजेत्या प्रथम क्रमांक प्राप्त गटास सन्मानचिन्हे, गोल्ड मेडल व रोख रक्कम १००० रुपये, द्वितीय क्रमांक प्राप्त गटास सन्मानचिन्हे, सिल्व्हर मेडल व रोख रक्कम ८०० रुपये, तृतीय क्रमांक प्राप्त गटास सन्मानचिन्हे, ब्रॉंझ मेडल व रोख रक्कम ६०० रुपये याचबरोबर प्रमाणपत्र व चिऊताईसाठी फिडर ही पारितोषिके देण्यात आली. तसेच दोन्ही गटातून प्रत्येकी एक उत्तेजनार्थ पारितोषिक दिले गेले. या ठिकाणी प्रत्येक सहभागी शाळेस सन्मानचिन्हे देऊन गौरवण्यात आले. तसेच उपस्थित पत्रकार यांनाही मानचिन्हे देण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश पाटील यांनी यशस्वीपणे पार पाडले. कु. साईराज परब यांनी विद्यार्थी व शिक्षक यांच्यात परस्पर संवाद साधत, हसतखेळत प्रश्नमंजुषेचा कार्यक्रम घेऊन चिमणी संवर्धन विषयी जागरूकता निर्माण केली. कार्यक्रमाचे आभार साक्षी परब यांनी मानले.

स्पॅरोताई फाऊंडेशनच्या प्रसिद्धी प्रमुख सौ. प्रणाली गिरी यांनी शाळांना संपर्क करून स्पर्धेविषयी संपूर्ण माहिती देत स्पर्धकांना प्रेरणा देऊन एकत्र गुंफण्याचे कठीण कार्य पार पाडले तसेच रुची पारकर व कश्मिरा पाताडे, सुवर्णा कांबळी, सारिका वायाळ, दिपश्री गावडे, साक्षी परब यांनी सन्मानचिन्हे व मेडल साकारण्यासाठी अतिशय मेहनत घेतली. स्पॅरोताई फाऊंडेशनच्या संस्थापिका डॉ. ज्योती परब व संस्थापक डॉ. राज परब यांनी असे मत व्यक्त केले की, 'मनात चिमणी असेल तरच घरात चिमणी येईल' तसेच आजच्या विद्यार्थ्यांना अर्थात देशाच्या भावी पिढीला याच वयात चिमणी संवर्धनाचे धडे दिले तर हेच विद्यार्थी पुढे पक्षी संवर्धनासाठी ठोस पाऊल उचलतील.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माणिक पाटील, नरेंद्र जैन, अर्जुन परब, सुगंधा परब, डॉ. अक्षय मंगवडे, मृणाल सावंत, प्रमोद सावंत, श्रीमती रजनी धाटावकर. साईराज परब, जगतसिंग चुंडावत, निशिकांत महांकाळ, रघुनाथ अडसुळ, अर्चना अडसुळ, सुनिल गिरी,पवनसिंग रजपूत, गोकुळ पाटील, वनरक्षक प्रकाश पवार, केशव बनसोडे, दिलीप स्वामी विभागीय समादेशक RSP NCD नागपूर, राजेंद्र गोसावी, प्रकाश माळी हेमंत नेहते व महाराष्ट्र पत्रकार संघाचे तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे मयुर सुरवसे, प्रदीप पाटील व करिश्मा कवडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# गतिमान कारभारासाठी प्रशिक्षण गरजेचे

## - मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : "क्षेत्रीय कार्यालयांसाठी 100 दिवसांचा कृती कार्यक्रम" या अंतर्गत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुचनेनुसार जिल्हा परिषद, ठाणे च्या सामान्य प्रशासन विभाग आयोजित नवनियुक्त कर्मचारी यांचे आस्थापना व आदी विषयांबाबत पायाभूत प्रशिक्षण आज शुक्रवारी, दि. 21 मार्च, 2025 रोजी सकाळी 10.30 वाजता, बी.जे. हायस्कुल, ठाणे येथे आयोजित करण्यात आला होता. या प्रशिक्षणाचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक रोहन घुगे यांच्या हस्ते संपन्न झाला.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे म्हणाले की, " जिल्हा परिषदेत नवनियुक्त अधिकारी- कर्मचारी यांना शासकीय कामकाज उत्तमरित्या करता यावे, यासाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात आला आहे. सर्व नवनियुक्त जिल्हा परिषदेचे कर्मचारी यांनी आजच्या प्रशिक्षणात शासकीय कामकाजाचे स्वरूप समजून घ्यावे. येणाऱ्या अडचणीवर मात करण्यासाठी हे प्रशिक्षण मोलाचे आहे. त्यामुळे प्रत्येक प्रशिक्षणार्थींना कामकाज उत्तम करण्यासाठी मदत होईल. तसेच इतर विषयाचे व येणाऱ्या अडचणींवर वेळत मात करण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण पुढील काळात देखील नियोजन जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येईल. कार्यालयातील प्रशासकीय कामकाज गतिमान करण्यासाठी प्रशिक्षण महत्त्वाचे आहे".

प्रास्ताविक करताना उप मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे यांनी नवनियुक्त, अनुकंपा तत्त्वावर नवनियुक्त तसेच जिल्हा बदलीने जिल्हा परिषदेच्या सेवेत रूजू झालेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी माहिती अधिकार, रजा नियम, टिप्पणी, पत्रलेखन, शिस्त व अपिल, इ-ऑफिस, मानसिक स्वास्थ व्यवस्थापन, GEM, कृत्रिम बुद्धीमत्ता या विषयावरील प्रशिक्षण आयोजित करण्यात आला आहे. या प्रशिक्षणानंतर अधिकारी व कर्मचारी यांनी कामकाज वेगाने करणे अपेक्षित आहे, असे प्रतिपादन केले.

यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ललिता दहीतुले, जिल्हा कृषी अधिकारी एम. एम. बाचोटीकर, सहाय्यक प्रशासन अधिकारी कल्पना तोरवणे, विस्तार अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग) वैभव वायकर प्रशिक्षक तसेच जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे यांनी माहिती अधिकार, सेवानिवृत्त सहाय्यक प्रशासन अधिकारी शुभांगी रावत यांनी रजा नियम, टिप्पणी, पत्रलेखन, शिस्त व अपिल, जिल्हा समन्वयक, इ-ऑफिस,रायगड कृष्णा उथळे यांनी ई-ऑफिस, महाराष्ट्र मेंटल हेल्थ संस्था,पुणे रेश्मा कचरे यांनी मानसिक स्वास्थ व्यवस्थापन, GEM, मास्टर ट्रेनर, अहिल्यानगर अशोक कडनर यांनी GEM Portal, जिल्हा परिषदेचे तंत्रज्ञान सहा./सल्लागार शुभांगी देसाई यांनी कृत्रिम बुद्धीमत्ता (Artificial Intelligence) यांनी संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले.

अर्थ विभागातील कनिष्ठ सहाय्यक (लेखा), वरिष्ठ सहाय्यक (लेखा), बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंता (विद्युत), स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक , सामान्य प्रशासन विभागातील कनिष्ठ सहाय्यक, वरिष्ठ सहाय्यक, लघुलेखक निम्न श्रेणी, पशुसंवर्धन विभागातील पशुधन पर्यवेक्षक, शिक्षण (प्राथमिक) विभागातील विस्तार अधिकारी (शिक्षण), ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), आरोग्य विभागातील आरोग्य सेवक (पुरुष), आरोग्य सेवक (महिला), आरोग्य पर्यवेक्षक तर ग्रामपंचायत विभागातल ग्रामसेवक असे एकूण 165 अधिकारी-कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

# अंगणवाड्यांमध्ये दिव्यांग प्रोटोकॉल प्रशिक्षण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : एकात्मिक बालविकास सेवा योजना, महिला व बालविकास विभाग, नवी मुंबई महानगरपालिका आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या अनुषंगाने "दिव्यांग बालकांसाठी प्रोटोकॉल" या विषयावर दि.7 मार्च ते 12 मार्च 2025 या कालावधीत शिक्षा प्रशिक्षण केंद्र (ETC) सेंटर, वाशी येथे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. बाल विकास प्रकल्प नवी मुंबई या प्रकल्पातील 226 अंगणवाडी सेविकांना 4 टप्प्यांत देण्यात आले. अशी माहिती एकात्मिक बालविकास सेवा योजनेचे आयुक्त कैलास पगारे यांनी दिली.

दिव्यांग बालकांचा लवकर शोध, निदान आणि उपचार हे त्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण व सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महत्वाचे आहे. अशा दिव्यांग बालकांचा शोध घेऊन त्यांना वेळेत योग्य सेवा व उपचार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सदर प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रशिक्षणामुळे बालकांचे अचूक स्क्रीनिंग होऊन आवश्यक ती वैद्यकीय व इतर मदत या बालकांना देणे शक्य होणार आहे, याचा लाभ नवी मुंबई महानगर पालिका क्षेत्रातील दिव्यांग बालकांना होणार आहे.या प्रशिक्षणामुळे अंगणवाडी सेविकांना दिव्यांग बालकांची लवकर ओळख करून, त्यांना आवश्यक त्या सेवांसाठी मार्गदर्शन करता येणार आहे. दिव्यांग बालकांना अंगणवाडी मध्ये समावेशक पूर्व शालेय शिक्षणाचा लाभ घेता येईल.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार सर्वसमावेशक शिक्षणाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने हे प्रशिक्षण, एक महत्त्वाचे पाऊल आहे. या प्रशिक्षण प्रायोगिक पातळीवर एका प्रकल्पात राबविण्यात आलेले आहे. आगामी काळात दिव्यांग बालकांसाठी प्रोटोकॉल हे प्रशिक्षण महाराष्ट्रातील सर्व अंगणवाडी केंद्रामध्ये राबविण्याचा मानस आहे.

महिला व बालविकास विभाग मंत्रालय नवी दिल्ली यांनी नोव्हेंबर 2023 मध्ये दिलेल्या दिव्यांग बालकांसाठी प्रोटोकॉलच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाच्या दिव्यांग बालकांसाठी प्रोटोकॉलवर आधारित दिव्यांग बालकांच्या स्क्रीनिंग, निदान व उपचार प्रक्रिया या प्रशिक्षण देण्यात आले. अशी माहिती एकात्मिक बालविकास सेवा योजनेचे आयुक्त कैलास पगारे यांनी दिली.

## एमटीएस स्पर्धा परीक्षेत
# सान्वी पवार राज्यात अव्वल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : नुकत्याच जाहीर झालेल्या महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेत पेण येथील श्रीमती सुमतीबाई देव प्राथमिक विद्यालयातील (सुबोध शाळा) विदयार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले असून एकूण ११ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत चमकले. यामध्ये इयत्ता दुसरी सानवी दिनेश पवार ही विद्यार्थीनी राज्यात सर्वप्रथम आली. तर चिन्मय दुर्गेश वारगुडे- राज्यात ११ वा - (जिल्ह्यात दुसरा) हार्दिक मोहन पाटील व कृपा कैलास पाटील राज्यात २३ वी - (जिल्हयात



चौथा) इयत्ता तिसरी मध्ये श्रीमयी तुकाराम वर्गे -राज्यात सहावी (जिल्हयात पहिली)लाभ राजेश कोठेकर राज्यात १४ वा आराध्य भूषण पाटील- राज्यात १७ वा स्वरूप विश्वनाथ ठाकर- राज्यात २० वा अनुज पांडुरंग पडळकर - राज्यात २१ वा.

इयत्ता चौथीमध्ये काव्या शिरीष पाटील राज्यात १९ वी वल्लरी प्रेमनाथ म्हात्रे राज्यात २५ वी या सर्व विदयार्थ्यांना शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. घोडके मॅडम तसेच तसेच शाळेतील शिक्षकांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. सर्व गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांचे पेण शिक्षण महिला समितीच्या अध्यक्षा सुहासिनी देव कार्यकारिणी मंडळातील सदस्यांनी कौतुक करून विद्यालयाच्या गुणवत्तेची परंपरा कायम राखल्याबददल आनंद व्यक्त केला.

# अटाळीत ६० वर्षीय वृद्धेची हत्या

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : आंबिवली स्टेशन नजीक अटाळीत 60वर्षीय वृध्देची गुरुवारी रात्री वृध्देची हत्या केली. आंगावरील दागिने चोरट्याने लंपास झाल्याने चोरीच्या उद्देशातून ही हत्या झाली असावी असा संशय यानिमित्ताने होत आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून हळहळ व्यक्त होत आहे.सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अटाळी ज्ञानेश्वर नगर मधील चाळीवजा राहत्या घरात वुध्दा रजनी चंद्रकांत पाटकर (60) एकट्याच होत्या. त्यांचे पती ,मुलगी स्वाध्याय निमित्ताने गुरुवारी रात्री बाहेर गेले असता, अज्ञात चोरट्याने घरात शिरकाव करीत वुध्देला जीवे ठार मारित, आंगावरील दागिने घेऊन पोबारा केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. स्वाध्याय वरून रात्री साडे न ऊच्या सुमारास पती व मुलगी घरी परतल्यावर महिला रक्ताच्या थारोळ्यात आढळल्या. त्यांना रूग्णालयात नेले असता त्यांना डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. दरम्यान आंगावरील दागिने गायब असल्याने अज्ञात चोरट्याने हत्या करून सोन्याचे दागिने चोरून पोबारा केला असावा असा संशय व्यक्त होत असून खडकपाडा पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून, या प्रकरणी खडकपाडा पोलीस अधिक तपास करीत आहेत.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) — कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) — कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) — कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) — कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) — कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# केडीएमसीच्या शिक्षण विभागांतर्गत निरक्षरांची परीक्षा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : केंद्र सरकार पुरस्कृत नवभारत साक्षरता अभियान अंतर्गत महाराष्ट्र राज्य शासन शिक्षण विभाग योजना, जि.प.ठाणे शिक्षण विभाग योजना कार्यालय यांच्या आदेशानुसार या शैक्षणिक वर्षातील सर्वेक्षणातून ज्या असाक्षरांची नोंदणी क.डों. मनपा क्षेत्रातील शाळांनी केलेली आहे अशा एकूण 2153 असाक्षरांची परिक्षा दिनांक रविवार, 23 मार्च2025 रोजी सकाळी 10 ते संध्या.5 या वेळेत होणार आहे.

या परीक्षेच्या संदर्भातल्या सर्व महत्त्वाच्या सूचना सीआरसी प्रमुखांच्या मीटिंग मध्ये देण्यात आलेल्या आहेत. सीआरसी प्रमुख त्यांच्या सीआरसी अंतर्गत सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांच्या मिटिंगमध्ये या सूचना देणार आहेत. परीक्षा केंद्रांना जिल्हा, तालुका,मनपास्तरावरील अधिकारी ,शिक्षण विभागाचे अधिकारी ,कर्मचारी तसेच सीआरसी प्रमुख भेटी देऊन माहिती घेणार आहेत.

या परीक्षेच्या संदर्भातील सूचना देण्यासाठी शुक्रवार दि. 20मार्च 2025 रोजी सीआरसी प्रमुखांची मीटिंग घेऊन त्यामध्ये शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी रमेश चव्हाण तसेच शिक्षणाधिकारी विजय सरकटे ,विषयतज्ञ चंद्रमणी सरदार तसेच टेक्नोसेवी शिक्षक विलास लिखार यांनी मार्गदर्शन केले तसेच विषयतज्ञ संतोष पाटील व गुरुनाथ इसामे यांनी परीक्षेचे साहित्य वाटप केले, तसेच या परीक्षे संदर्भात जनजागृती व्हावी जेणेकरून जास्तीत जास्त असाक्षर परीक्षेस उपस्थित राहतील असे आवाहनही शिक्षणाधिकारी विजय सरकटे यांनी केले आहे.

# राज्यात महापुराभिलेख भवन उभारणार

## – सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड आशिष शेलार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : पुराभिलेख संचालनालयाकडून दुर्मिळ व ऐतिहासिक कागदपत्रांच्या जतन व संवर्धनाचे महत्त्वाचे काम करण्यात येते. या कामासाठी पुराभिलेख संचालनालयाची एलफिस्टन महाविद्यालयातील जागा अपुरी पडत आहे. दुर्मिळ व ऐतिहासिक कागदपत्रांचा महत्त्वाचा ठेवा सुस्थितीत ठेवण्यासाठी मुंबईतील वांद्रे पूर्व येथील पुराभिलेख संचालनालयाच्या ६ हजार ६९१ चौरस मीटर जागेवर सुसज्ज असे महापुराभिलेख भवन उभारण्यात येणार आहे, अशी घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री



ॲड आशिष शेलार यांनी विधानसभेत निवेदनाद्वारे केली.

सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार म्हणाले, या प्रस्तावित महापुराभिलेख भवनमध्ये तापमान व आर्द्रता नियंत्रित अभिलेख कक्ष, स्वतंत्र बांधणी कक्ष, प्रती चित्रण शाखा, देश-विदेशातून येणाऱ्या इतिहास संशोधकांसाठी संशोधन कक्ष, प्रदर्शन दालन असणार आहे. पुराभिलेख संचालनालय १८२१ पासून कार्यरत असून त्याचे मुख्यालय मुंबई येथे आहे.

पुराभिलेख संचालनालयाकडे १७.५० कोटी ऐतिहासिक कागदपत्रे आहेत. त्यापैकी १० कोटी ५० हजार कागदपत्रे मुंबईत आहेत. सन १८८९ पासून एलफिस्टन महाविद्यालयाच्या इमारतीत या कागदपत्रांच्या जतन व संवर्धनाचे काम अव्याहतपणे सुरू आहे. मात्र जागेअभावी या कागदपत्रांचे जतन व संवर्धनावर मर्यादा येत आहेत. त्यामुळे शासन महापुराभिलेख भवन उभारत आहे, असेही श्री शेलार यांनी सांगितले.

# नागरी संरक्षण संघटनेतील महिलांचा सन्मान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर नागरी संरक्षण संघटनेचे व पर्यायाने देश सेवेचे कार्य सातत्य पूर्वक व निस्पृहतेने करणाऱ्या महिलांना उपनियंत्रक, नागरी संरक्षण यांच्याकडून विशेष सेवा सन्मानपत्र देवून गौरविण्यात आले. 8 मार्च हा जागतिक महिला दिन असतो. ह्या विशेष दिवसाचे औचित्य साधून संघटनेसाठी गेली अनेक वर्षे सातत्याने कार्य करणाऱ्या स्वयंसेवी महिलांचा सन्मान करणे हे महिलांना प्रोत्साहन व नवी ऊर्जा देणारे ठरेल म्हणून हा विशेष कार्यक्रम 8 मार्चला कार्य व्यस्तता



असल्याने 21 मार्च रोजी कल्याण मधील बालक मंदिर शाळेत आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी विजय जाधव, उप नियंत्रक स्वतः होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून ठाणे महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त संध्या साळुंखे आणि ठाणे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. अनिता जवंजाळ या विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या. तसेच बालक मंदिर संस्थेच्या ओक हायस्कूलच्या मुख्याध्यापिका कांचन इंगोले आणि संस्थेचे विश्वस्त रमेश गोरे देखील या कार्यक्रमास उपस्थित होते.

# ठाणे हाऊसिंग सोसायटी इमारतीवरील मोबाईल टॉवर काढणार

## – मंत्री उदय सामंत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : ठाणे जिल्ह्यातील मौजे मांडा येथील श्री. विनायक आशिष को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी या इमारतीवर इंडस कंपनीने मोबाइल टॉवरची उभारणी केली आहे. या टॉवरमुळे होणाऱ्या त्रासाची तक्रार येथील नागरिकांनी महापालिकेकडे केली आहे. त्यानुसार या इमारतीवरील टॉवर काढून टाकण्याची कारवाई करण्यात येईल, अशी माहिती मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

या मोबाईल टॉवर कारवाई बाबत सदस्य नाना पटोले यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेमध्ये सदस्य भास्कर जाधव, कृष्णा खोपडे, वरुण सरदेसाई यांनीही सहभाग घेतला.

या प्रश्नाच्या उत्तरात मंत्री सामंत म्हणाले, मोबाईल टॉवर उभ्या करणाऱ्या इंडस कंपनीने रहिवाशांचा विरोध जुगारून महापालिकेद्वारा सील केलेल्या टॉवरचा सील तोडून विनापरवानगी प्रक्षेपण सुरू केले. ही बाब कल्याण - डोंबिवली महापालिकेच्या निदर्शनास येताच पालिकेने सदर टॉवर अनधिकृत घोषित करून निष्कासित करण्याची कारवाई सुरू केली आहे. आता या टॉवरला काढून टाकण्याचीच कारवाई करण्यात येणार आहे.

# मुंबईतील सर्व होर्डिंगचे तीन महिन्यात ऑडिट पूर्ण करणार

## – उदय सामंत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मुलुंड टोल नाक्यावरील होर्डिंग महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे (एमएसआरडीसी) असून, महानगरपालिकेची परवानगी घेण्याच्या अटीवर एमएसआरडीसीने एजन्सीला होर्डिंग लावण्याची परवानगी दिली होती. मात्र, संबंधित एजन्सीने महानगरपालिकेकडून परवानगी न घेताच होर्डिंग लावल्यामुळे महापालिकेने कारवाई केली आहे. मुंबईतील सर्व होर्डिंगचे समग्र लेखा परीक्षण तीन महिन्यांत पूर्ण केले जाणार असून, त्याबाबतचा अहवाल पुढील अधिवेशनात सादर करण्यात येईल, असेही मंत्री सामंत यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात स्पष्ट केले आहे.

याबाबतचा प्रश्न सदस्य अमित साटम यांनी उपस्थित केला तर सदस्य योगेश सागर, पराग अळवणी यांनी उपप्रश्न उपस्थित केला.

मंत्री सामंत म्हणाले, मुलुंड टोलनाक्यावरील जाहिरात फलक महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) निविदा प्रक्रियेद्वारे उभारले आहेत. मात्र या जाहिरात फलकांबाबत महानगरपालिकेने तपासणी केली असता, संबंधित फलकांसाठी मुंबई महानगरपालिकेची मान्यता घेण्यात आलेली नसल्याचे आढळून आले असल्याने जाहिरात फलकांवर प्रदर्शित जाहीरातींचे त्वरित काढून टाकण्यात आला आहे. मुलुंड टोल नाक्यावरील होर्डिंगवर महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय कोणतीही माहिती प्रसारित होणार नाही. परवानगीशिवाय माहिती प्रसारित केल्यास संबंधित कंत्राटदारावर कठोर कारवाई केली जाईल.

# जागतिक जल दिनानिमित्त जल सुरक्षा दिंडी




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : जागतिक जल दिनानिमित्त आज डोंबिवलीतील पर्यावरण दक्षता मंडळ, विवेकानंद सेवा मंडळ, ऊर्जा फौंडेशन आणि श्री लक्ष्मी नारायण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने टिळकनगर विद्यामंदिर, स. है . जोंधळे विद्यालय आणि स. वा. जोशी विद्यालय यांच्या विद्यार्थ्यांच्या " जल सुरक्षा दिंडी" चे आयोजन करण्यात आले होते. कल्याण डोंबिवली महानगरपालिका आणि श्री गणेश मंदिर संस्थान यांच्या सहकार्याने ही दिंडी पार पडली. पाणी या नैसर्गिक संसाधनाचे महत्व याप्रसंगी अधोरेखित करण्यात आले. सुमारे ३०० विद्यार्थी तसेच शिक्षक आणि ५० नागरिकांनी यात सहभाग घेतला.

२२ मार्च हा दिवस दरवर्षी जागतिक जल दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने पाण्याचे महत्त्व आणि त्याचा जपून वापर करण्यासाठी लोकांना आवाहन केले जाते. यंदाच्या जागतिक जल दिनासाठी ' हिमनदी संवर्धन ' ही संकल्पना घेतली गेली आहे. त्यानिमित्ताने गोड्या पाण्याच्या साठयांचे महत्त्व आपण सर्वांनी जाणून घेतले पाहिजे. आपल्या पुढील पिढ्यांसाठी स्वच्छ पाणी उपलब्ध करून देणे ही आपली जबाबदारी आहे.

पाण्याचा प्रत्येक थेंब महत्वाचा आहे. प्रत्येकाने जाणीवपूर्वक पाण्याचा अपव्यय टाळण्याचा प्रयत्न करावा आणि परिसरातील जलस्त्रोतांचे प्रदूषण रोखावे यासाठी पाण्यासारख्या नैसर्गिक संसाधनाचे संरक्षण आणि संवर्धन करण्याची प्रतिज्ञा याप्रसंगी सर्व उपस्थितांना देण्यात आली. तिन्ही शाळांचे विद्यार्थी वेगवेगळया मार्गाने मार्गक्रमण करत, पाणी बचतीचा संदेश देत फडके रोड वरील श्री गणेश मंदिर संस्थान येथे एकत्र आले. श्री गणेशाला वंदन करून पाणीटंचाईचे संकट दूर व्हावे यासाठी प्रार्थना करण्यात आली. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत माननीय रोहिणी लोकरे, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, पर्यावरण विभाग प्रमुख यांनी कार्यक्रमाचा समारोप केला.

तत्पूर्वी श्री लक्ष्मी नारायण संस्थेच्या सुरेखा जोशी यांनी गाण्यातून जलसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. श्री गणेश मंदिर संस्थानचे प्रवीण दुधे यांनी गणेश मंदिराच्या पर्यावरण पूरक उपक्रमांची माहिती दिली. या जल सुरक्षा दिंडी मध्ये विवेकानंद सेवा मंडळाच्या स्वच्छ डोंबिवली अभियानचे अनिल मोकल व त्यांचे सहकारी, पर्यावरण दक्षता मंडळ डोंबिवलीच्या रूपाली शाईवाले आणि त्यांचे सहकारी तसेच ऊर्जा फाउंडेशनच्या मेधा गोखले, स्नेहल दीक्षित आणि सहकारी सहभागी झाले होते.

# खाजगी विनाअनुदानित संघटनेने राबवली 'ए आय' कार्यशाळा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : खाजगी विनाअनुदानित शाळा व्यवस्थापन संघटना पुस्माच्या संयुक्त विद्यमाने कल्याणच्या साकेत कॉलेज ऑफ एज्युकेशनने एक महत्त्वपूर्ण कार्यशाळा यशस्वीरित्या आयोजित केली होती. शिक्षण संस्थाना अत्याधुनिक एआय साधनांसह सक्षम करण्यासाठी डिझाइन केलेल्या या कार्यक्रमात मुंबई महानगर प्रदेशातील 60 हून अधिक शाळांचे विश्वस्त, प्रिन्सिपल आणि समन्वयक आणि 160 हून अधिक सहभागींनी सहभाग घेतला. पुस्माच्या अध्यक्षा डॉ. अर्चना रॉड्रिग्स, साकेत ज्ञानपीठाचे सचिव साकेत तिवारी, पुस्माचे सचिव डॉमिनिक पॉल आणि माजी अध्यक्ष भरत मलिक, ॲड. गव्हर्निंग कौन्सिल सदस अशोक साळवे आणि अजित बालन यांच्या पाठिंब्याने या कार्यशाळेचे यश मिळाले.

प्रख्यात प्रशिक्षक विलीब्रॉर्ड जॉर्ज यांनी हे पूर्ण दिवसीय सत्र आयोजित केले, ज्यात शैक्षणिक पद्धती बदलण्यासाठी डिझाइन केलेल्या क्रांतिकारी एआय अनुप्रयोगांवर लक्ष केंद्रित केले. कार्यशाळेत अनेक विषयांचा समावेश होता. यासहः मजकूर निर्मिती आणि धड्याच्या नियोजनासाठी चॅट जीपीटी, सादरीकरणे, पुस्तके आणि सोशल मीडिया पोस्टमध्ये सामग्री डिझाइन करण्यासाठी गॅमा एआय, आकृती आणि इन्फोग्राफिक्ससह पुस्तके तयार करण्यासाठी नॅपकिन एआय, दोन-व्यक्ती आणि परस्परसंवादाची सुविधा देणारी नोटबुक एलएम, व्हॉईस बॉट्स आणि एजंट्स विकसित करण्यासाठी एआय प्ले करा, व्हिडिओ क्राफ्टिंग आणि कॅप्शनिंग कॅप्शनिंग आणि कॅपॅलिटीज डिझाइन करण्यासाठी हे जेन ॲप. डिजिटल स्पेसमध्ये शाळांना स्थान देण्यासाठी एआय विपणन धोरण आजमावले.

पुस्माच्या अध्यक्षा अर्चना रॉड्रिग्स यांनी कार्यशाळेच्या उद्घाटनपर भाषणात आजच्या शैक्षणिक वातावरणात एआयच्या वाढत्या भूमिकेवर भर दिला. तिने विद्यार्थ्यांद्वारे तंत्रज्ञानाचा झपाट्याने अवलंब करणे आणि गतिमान शिक्षण अनुभव सुनिश्चित करण्यासाठी शिक्षकांनी या प्रगतीसह राहण्याची गरज यावर प्रकाश टाकला.

जीईएमएस एज्युकेशन इंडिया रिजनचे वरिष्ठ उपाध्यक्ष विलीबॉर्ड जॉर्ज यांनी या कार्यशाळेचे कुशलतेने संचालन केले. जॉर्जने एआयच्या गुंतागुंतीबद्दल मौल्यवान अंतर्दृष्टी प्रदान केली, ज्यामुळे उपस्थितांना शैक्षणिक संस्थांमधील त्याचे व्यावहारिक अनुप्रयोग अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यात मदत झाली.. त्याच्या सत्रात AI शिकवणे आणि शिकण्याच्या दोन्ही प्रक्रिया कशा वाढवू शकते, शिक्षकांना वर्गातील तांत्रिक उत्क्रांतीमध्ये नेव्हिगेट करण्यासाठी आवश्यक असलेल्या साधनांसह सुसज्ज कसे करू शकते याचे तपशीलवार अन्वेषण सादर केले.

या कार्यक्रमात कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे उपायुक्त संजय जाधव यांच्यासह मान्यवरांचेही स्वागत करण्यात आले. आपल्या भाषणात, त्यांनी विविध क्षेत्रांमध्ये चालू असलेल्या बदलांबद्दल आणि या बदलांना चालना देण्यासाठी तंत्रज्ञानाच्या महत्त्वपूर्ण भूमिकेबद्दल सांगितले. या कार्यक्रमाला कल्याण डोंबिवली महानगरपालिका शिक्षण विभाग प्रमुख सरकटे उपस्थित होते.

आर्य ग्लोबल ग्रुपचे अध्यक्ष आणि पुस्माचे माजी अध्यक्ष भरत मलिक यांनी नमूद केले, "एआय आणि लर्निंग हातात हात घालून चालते आणि अध्यापन अधिक प्रभावी करण्यासाठी शिक्षकांना नवीन साधनांसोबत राहावे लागते. पुस्माचा समुदाय विकासावर विश्वास आहे आणि आम्ही पुढच्या पिढीतील पुढाऱ्यांचा एक गट सुरू केला आहे जो पुढे पुढाकार घेतील."

# उल्हास नदी बचावासाठी आंदोलन सुरु

## गेल्या ८ वर्षांपासून माजी नगरसेवकांचा उल्हास नदी साठी लढा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : शनिवारी 22 मार्च, जागतिक जलदिनी शासन व प्रशासनाचा निषेध म्हणून स्वतःचे मुंडन करून कल्याण मधील माजी नगरसेवकांनी उल्हास नदी बचाव आंदोलनाला सुरुवात केली आहे. कार्यालयीन वेळेत दररोज उल्हास नदीच्या दूषित पाण्यात, जलपर्णीमध्ये उभे राहून बेमुदत आंदोलन केले जाणार असल्याची माहिती नितीन निकम यांनी दिली.

गेल्या 8 वर्षांपासून उल्हास नदी प्रदूषणमुक्त व्हावी, पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळावे म्हणून मी कल्याणकर सामाजिक संस्थेचे अध्यक्ष तथा माजी नगरसेवक नितीन निकम यांनी अनेक आंदोलने केलीत परंतु प्रत्येकवेळी शासन व प्रशासनाने लेखी व तोंडी आश्वासने देऊन फसवणूकच केली असल्याचा आरोप निकम यांनी केला आहे. उल्हास नदी बचावासाठी खचून न जाता लढाई हि सुरुच ठेवणार असल्याच त्यांनी सांगत प्रशासनाचा निषेध म्हणून मुंडन करत आंदोलनाला सुरवात केली आहे. या आंदोलनात त्यांच्या समवेत माजी नगरसेवक



उमेश बोरगावर यांच्यासह इतर अनेक सामाजिक संस्था देखील सहभागी झाले आहेत.


ठाणे जिल्ह्यातील जवळपास 80 ते 90 लाख लोक आजही उल्हास नदीतील सांडपाणी पीत आहेत, या दूषित पाण्यामुळेच नागरिक मोठ्या प्रमाणावर आजारी पडत आहेत. त्यामुळे उल्हास नदीत सोडणारे सर्व प्रदूषित सांडपाण्याचे नाले हे तातडीने बंद व्हावेत. उल्हास नदी जलपर्णीमुक्त व्हावी. मोहोने बंधाऱ्याच्या काही मीटर अंतरावर अगोदर एक नवीन बंधारा बांधण्यात यावा व सद्यस्थितीत असलेल्या मोहोने बंधाऱ्याजवळ सांडपाण्याचा मैला व अशुद्ध केमिकलयुक्त गाळ काढण्यात यावा. दूषित उल्हास नदीचे अतिरिक्त पाणी मराठवाड्याला देण्यासाठी कोणतीही योजना असेल तर ती रद्द करावी या मागण्यांसाठी गेल्या 8 वर्षांपासून आंदोलन करत असल्याची माहिती माजी नगरसेवक नितीन निकम यांनी दिली.

# वाडे बोल्हाई गावात उत्सव साजरा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

श्री क्षेत्र वाडे बोल्हाई - कोकणात दशावतार हे एक पारंपरिक लोकनाट्य आहे, ज्यात भगवान विष्णूच्या दहा अवतारांचे ( मत्स्य, कूर्म, वराह, नरसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, बौद्ध आणि कल्कि ) सादरीकरण केले जाते.

वाडे बोल्हाई या गावामध्ये खुप जुन्या काळापासुन सोंगा चा कार्यक्रम केला जातो . त्यामध्ये प्रथम सकाळी देवीचा अभिषेक केला जातो , त्यानंतर सायंकाळी आईसाहेबांचा ९ वा छबिना निघतो



, छबिना संपला की, पारंपारिक सोंगाचा कार्यक्रम सुरू होतो , त्यामध्ये गणपती बाप्पा ,श्री हनुमान , रावण व काही वर्षांपासून चालत आलेले सोंग चेंडवाल , गोंडवाल , झाडु मेस्ती ,शारदा असे विविध प्रकारचे सादरीकरण केले जाते . गावातील दक्षता तरूण मंडळाच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे नियोजन केले जाते . त्यात वयस्कर लोकां पासुन ते तरुण पिढीची मुलं या पारंपारीक कार्यक्रमात सहभाग दाखवतात . अशी माहिती शंकरराव साळुंके यांनी दिली .

हा वाडे बोल्हाई चा यात्रोत्सव खूप उत्सव वर्धक पद्धतीने साजरा केला जातो , अशी माहिती स्वराज भालेकर, सुयोग भालेकर, ओमकार भालेकर, शिवार भालेकर , पंढरीनाथ भालेकर , सनी भालेकर, भगवान जाधव , शिंदे , साळुंके , गाडेकर , पाचंगे , कुंभार , सावंत यांनी दिली .

# केडीएमसी क्षेत्रातील अनधिकृत शाळांमध्ये प्रवेश घेऊ नये

## प्रशासनाचे आवाहन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रातील शासनाच्या परवानगी शिवाय सुरु असलेल्या प्राथमिक शाळांची यादी जाहीर करण्यात आली असून, या शाळांमध्ये आपल्या पाल्यांचे प्रवेश घेवू नयेत, असे आवाहन कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने केले आहे.

या शाळेतील विद्यार्थ्यांचे नजिकच्या शाळांमध्ये समायोजन करण्यात येणार आहे. तसेच संबंधित अनधिकृत शाळांविरुध्द दंडात्मक कार्यवाही केली जाईल. या अनधिकृत प्राथमिक शाळांच्या यादीत १) एल.बी.एस. इंग्लिश स्कुल, बल्याणी टिटवाळा, २) सनराईज स्कुल, बल्याणी टिटवाळा, ३) संकल्प इंग्लिश स्कुल, बल्याणी टिटवाळा, ४) पूर्ण प्रज्ञा इंग्लिश स्कुल, बल्याणी टिटवाळा, ५) पोलारिस कॉन्व्हेन्ट स्कुल, बल्याणी टिटवाळा, ६) डी.बी. एस. इंग्लिश स्कुल, आंबिवली (पश्चिम), ७) ऑक्सफर्ड इंग्लिश स्कुल, आंबिवली (पश्चिम), ८) बुद्धीस्ट इंटरनॅशनल स्कुल, महाराष्ट्र नगर, डोंबिवली (पश्चिम) या इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा समावेश आहे.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# पालघर जिल्ह्यातील आरोग्य सेवेत सुधारणा होणार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी गेल्या आठवड्यात जिल्ह्याचा दौरा करून आरोग्यविषयक सेवेची परिस्थिती जाणून घ्यायचा प्रयत्न केला. या वेळी मंत्रिमहोदयांना जिल्ह्यात भेडसावणाऱ्या समस्यांची कल्पना प्राप्त झाल्याने येथील निधी तसेच मनुष्यबळाची समस्या सोडवण्यासाठी आगामी काळात सकारात्मक प्रयत्न होतील, याबद्दल अशा पल्लवित झाल्या आहेत.

पालघर जिल्ह्याच्या स्थापनेपूर्वीच कुपोषण, बालमृत्यू, मातामृत्यूबाबतचे डाग या भागाला लागले होते. जिल्हा स्थापनेनंतरदेखील आरोग्याशी संबंधित प्रश्न बराच काळ प्रलंबित राहिले. आता काही अंशी कुपोषणाचे प्रमाण नियंत्रणात आले असले तरीही बालमृत्यू व मातामृत्यू हे प्रमाण लक्षणीय आहे. गर्भवती महिलांना प्रसूतीपूर्वी किमान दोन वेळा सोनोग्राफी करण्याची आवश्यकता असताना शासकीय सेवेत रेडिओलॉजिस्ट नसल्याने खासगी क्षेत्रातील तज्ज्ञांकडून ते काम जेमतेम एक वेळा होताना दिसते. यामुळे गुंतागुंतीच्या प्रसूतीदरम्यान बालक व मातेचा मृत्यू होण्याच्या घटना घडल्या आहेत.

## संक्षिप्त

### पाणदिवड सापाच्या पिल्लांची सुटका



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : मार्च महिन्याचा प्रखर उन्हाळा सुरू आहे. सर्व साप शीत रक्ताचे असल्याने थंड वातावरण किंवा पाण्याच्या शोधात बाहेर पडत आहेत. चिकनघर परिसरात वास्तव्यास असणारे तुषार खापरे यांच्या घराबाहेरील जागेत सारखे साप आढळत होते काल साप आढळून आला असता त्यांनी जेष्ठ सर्पमित्र दत्ता बोंबे यांना संपर्क करून ही घटना सांगितली सर्पमित्र बोंबे यांनी तत्काळ निसर्गमित्र नरेंद्र भिवंडीकर यांच्या मदतीने सापांचा शोध घेतला असता एक दोन नव्हे तर तब्बल १७ पिल्ले आढळून आली.

हा पान-दिवड साप बिनविषारी असला तरी अत्यंत चिडखोर स्वभावाचा असतो. हा साप पूर्वी नदी ओढ्यामध्ये मिळायचा परंतू वाढत्या शहरीकरणामुळे सांडपाणी असणाऱ्या नाल्यात हा साप आढळतो. हा साप मनुष्याला चावल्यास धनुर्वाताचे लक्षणे आढळून येतात. दत्ता बोंबे व नरेंद्र भिवडीकर यांनी पान-दिवड सापाच्या पिलांना सुरक्षीतरित्या पकडून शासकीय सोपस्कार करून पाणथळ ठिकाणी सर्व पिलांना निसर्गमुक्त केले.

### मानपाड्यातील ढाब्यांवर कारवाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : डोंबिवलीतील मानपाडा रस्त्यावरील मातोश्री चायनिज ढाबा, कोळेगाव येथील आई एकविरा ढाबा आणि खोणी तळोजा रस्त्यावरील चायना गार्डन चायनिज कॉर्नर ढाबा मालकांविरुध्द पोलिसांनी मद्य विक्रीचा कोणताही परवाना नसताना चायनिज ढाब्यात ग्राहकांना बेकायदा दारू विक्री केली म्हणून गुन्हा दाखल केला आहे. या तिन्ही ढाब्यांमध्ये चवीदार चायनिज आणि सोबत दारू मिळत असल्याने दिवस, रात्र या ढाब्यांना ग्राहकांची पसंती असते. डोंबिवली, कल्याण, शिळफाटा, पलावा, बदलापूर, मलंगगड भागातून ग्राहक याठिकाणी श्रमपरिहारासाठी येतात. मातोश्री, आई एकविरा आणि चायना गार्डन ढाबे मालक मद्य विक्रीचा परवाना नसताना ढाब्यांवर मद्य विक्री करत असल्याच्या वाढत्या तक्रारी मानपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्याकडे आल्या होत्या.

मागील चार दिवसापूर्वी पोलिसांनी दुपारच्या वेळेत या तिन्ही ढाब्यांवर अचानक छापे टाकले. साहाय्यक पोलीस निरीक्षक संपत फडोळ, हवालदार सोपान शेळके आणि पथकाने दुपारच्या वेळेत काटई बदलापूर पाईप लाईन रस्त्यावरील कोळेगाव येथील किशोर कुंडलिक पाटील (रा. अंतर्ली ) यांच्या आई एकविरा ढाब्यावर छापा टाकला. पोलिसांना ढाब्यात मंचकावर दारूचे पेले घेऊन ग्राहक बसले होते. विदेशी मद्याच्या बाटल्या पोलिसांना तेथे आढळल्या.

पोलिसांनी ढाबा मालक किशोर पाटील यांच्याकडे ढाब्यात दारू विक्री करण्यासाठी असलेली आवश्यक दारू विक्रीची शासन परवानगी मागितली. ती परवानगी किशोर पाटील दाखवू शकले नाहीत. चायनिज ढाब्याच्या नावाखाली ढाब्यात बेकायदा दारू विक्री केली म्हणून हवालदार सोपान शेळके यांनी ढाबा मालक कुंडलिक पाटील यांच्या विरुध्द महाराष्ट्र दारूबंदी प्रतिबंधक कायद्याने गुन्हा दाखल केला.

# जरा याद करो कुर्बानी.....




दीडशे ते दोनशे वर्ष इंग्रजांच्या पारतंत्र्यात असणाऱ्या भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी हजारो स्वातंत्र्य सैनिकांनी स्वतःच्या जीवाचे बलिदान दिले. अनेक जण फासावर चढले तर कित्येकांनी इंग्रजांच्या गोळया छातीवर झेलल्या. या वीर स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानाने १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत माता इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त झाली. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी छातीवर गोळया झेलल्या तर अनेक स्वातंत्र्य सैनिक हसत हसत फासावर चढले. भगत सिंग, राजगुरू आणि सुखदेव हे स्वातंत्र्य सैनिक देखील भारत मातेला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी हसत हसत फासावर चढले आणि शहीद झाले. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या जीवाची बाजी लावणारे स्वातंत्र्य सैनिक शहीद भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांना २३ मार्च १९३१ रोजी इंग्रजांनी फाशी दिली होती. आज २३ मार्च हा दिवस शहीदांच्या नावे कोरला गेला गेला आहे. आजच्याच दिवशी म्हणजे २३ मार्च १९३१ रोजी शहीद भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वतःच्या प्राणाचे बलिदान दिले.९४ वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी इंग्रजांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी दिली होती. देशासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या शहिदांना आदरांजली वाहण्यासाठी आजचा दिवस संपूर्ण देशात शहीद दिवस म्हणून साजरा केला जातो. १९२८ मध्ये सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले होते. या कमिशनला विरोध म्हणून लाला लजपतराय यांनी मोठा मोर्चा काढला होता. सायमन कमिशनला विरोध करणाऱ्या लाला लजपतराय यांच्यावर इंग्रजांनी लाठीहल्ला केला. या लाठी हल्ल्यात लाला लजपतराय गंभीर जखमी झाले त्यातच त्यांचा मृत्यू झाला. लाला लजपतराय यांच्या मृत्यूनंतर संपूर्ण देशात इंग्रजांविरुद्ध संतापाची लाट उसळली. लाला लजपतराय यांच्या मृत्युनंतर देशातील जहाल गटाचे स्वातंत्र्य सैनिक कमालीचे चिडले. चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, राजगुरु, सुखदेव आणि अन्य जहाल क्रांतिकारकांनी लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्याची शपथ घेतली. लाला लजपतराय यांच्या मृत्यूच्या एक महिन्याच्या आतच या क्रांतिकारकांनी आपली शपथ पूर्ण केली आणि १७ डिसेंबर १९२८ रोजी ब्रिटिश अधिकारी सँडर्सला गोळ्या घालून ठार केले. काही काळ ते भूमिगत राहिले मात्र फितुरीमुळे ते पोलिसांच्या हाती लागले. ७ ऑक्टोबर १९३० रोजी इंग्लिश कोर्टाने भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशीची शिक्षा सुनावली. यानंतर भगतसिंग यांची शिक्षा कमी व्हावी यासाठी फेर याचिका दाखल करण्यात आली मात्र १० मार्च १९३१ रोजी ती याचिका कोर्टाने फेटाळली. २३ मार्च हा दिवस भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांच्या फाशीसाठी निश्चित करण्यात आला. २३ मार्च १९३१ रोजी सकाळी ७ वाजून ३३ मिनिटांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी देण्यात आली. फाशीच्या वेळी या तिघांनी मेरा रंग दे बसंती चोला ...... हे गाणे गायले. फासावर लटकतानाही भारत मातेच्या या सुपुत्रांच्या चेहऱ्यावर कसल्याही प्रकारचे दुःख किंवा पश्चाताप नव्हता उलट भारत मातेसाठी फासावर जात असल्याचा अभिमान होता. आजच्या दिवशी भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त करण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या क्रांतिकारकांच्या बलिदानाचे स्मरण करणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या असंख्य ज्ञात अज्ञात शहिदांना शाहिद दिनी विनम्र अभिवादन!

लेखक
श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# कोरावळे जिल्हा परिषद शाळेचा सांस्कृतिक कार्यक्रम यश

## क्रीडा, शैक्षणिक क्षेत्रातही अव्वल कामगिरी




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड: टिळक स्कॉलर्स स्कूल, मुरबाड येथे ठाणे भारत स्काऊट गाईड आणि जिल्हा परिषद ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्काऊट गाईड एक दिवसीय शिबिरात जिल्हा परिषद शाळा कोरावळेने सांस्कृतिक कार्यक्रमात प्रथम क्रमांक पटकावून सर्वांनाच आश्चर्याचा सुखद धक्का दिला. शाळेच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गोंधळ नृत्याने उपस्थितांची मने जिंकली. तसेच, शोभायात्रा प्रकारातही शाळेने तृतीय क्रमांक मिळवला. या शिबिरात मुरबाड तालुक्यातील अनेक शाळांनी सहभाग घेतला होता. विविध स्पर्धांनी रंगलेल्या या कार्यक्रमात कोरावळे जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे प्रभावी प्रदर्शन केले. शाळेच्या या यशाबद्दल शिक्षण विस्तार अधिकारी दिगंबर पोटे यांनी विशेष कौतुक केले. शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रातही कोरावळेची यशस्वी घोडदौड सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात कोरावळे जिल्हा परिषद शाळेने तालुका आणि जिल्हा स्तरावरील क्रीडा स्पर्धांमध्ये दोन प्रकारांत विजय मिळवला. तालुकास्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धेत शाळेने प्रथम क्रमांक मिळवून जिल्हा स्तरावरही उत्तम प्रदर्शन केले. तसेच, शाळेतील इयत्ता आठवीच्या विद्यार्थिनी संचिता जगदीश धुमाळ आणि अर्चना अनिल धुमाळ यांनी NMMS या राष्ट्रीय स्तरावरील शिष्यवृत्ती परीक्षेत प्राविण्य मिळवले. शाळेचे मुख्याध्यापक मंगलदास कंटे यांनी विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल आनंद व्यक्त केला. "आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये अनेक कलागुण आहेत. त्यांना योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ते भविष्यात नक्कीच मोठे कलाकार आणि सर्वगुणसंपन्न नागरिक होतील," असे त्यांनी सांगितले. या शिबिरात कब बुलबुल आणि स्काऊट गाईडचे विविध उपक्रम राबवण्यात आले. मार्गदर्शक शिक्षक सीमा सोनवणे, शोभा उबाळे, कृष्णकांत मलिक, अनिल भोईर, प्रशांत माळी, प्रतीक्षा धुमाळ, वृषाली धुमाळ आणि यांनी विद्यार्थ्यांना वेळोवेळी विशेष मार्गदर्शन केले. ग्रामस्थांकडून विजयी विद्यार्थिनी वेदिका, अंकिता, लावण्या, प्रणाली, नेहा व सुवर्ण विद्यार्थिनींचे अभिनंदन करून शिक्षक व शाळा यांचेही अभिनंदन केले आहे.

# कोरावळे गावात गोठ्याला आग







## २२ शेळ्या, १५ कोंबड्या जळून खाक नऊ जनावरे गंभीर जखमी!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील कोरावळे गावाचे हद्दीत पुंडलिक विठ्ठल धुमाळ यांचा जनावरे, शेळ्यांचा बेडा असल्याने या बेड्याला गुरुवारी ता.२० मार्च २०२५ रोजी रात्री ८.३० वाजता अचानक आग लागली या लागलेल्या अचानक आगीमध्ये बेडयातील २० शेळया, १५ कोंबड्या जळून खाक झाल्या तर जखमीमध्ये एक म्हैस, तीन पारडे, सहा बैल, एक गाय, ही जनावरे मोठ्या प्रमाणात जखमी झाली आहेत. तसेच बेड्यातील जीवनावश्यक वस्तूचा मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. याची माहिति मिळताच कोरावळे सजाचे तलाठी राजेंद्र सुरोशे यांनी घटनास्थळी येऊन परिस्थितीचा प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामा केला आहे. सदर पंचनामांमध्ये वरील प्रमाणे दोन ते अडीच लाखाचे शेतकरी पुंडलिक विठ्ठल धुमाळ यांचे मोठे नुकसान झाल्याचे पंचनामे नमूद करण्यात आले आहे सदरचा पंचनामा तहसील कार्याला सादर करण्यात आला आहे. तरी शासन स्तरावर लवकरात लवकर मला भरपाई मिळावी अशी मागणी शेतकरी पुंडलिक विठ्ठल धुमाळ यांनी केली आहे.

## ७ वर्षे लेखापरीक्षण अहवाल सादर नाही

# वक्फ बोर्ड बरखास्त करा

**- ॲड. वीरेंद्र इचलकरंजीकर**



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखाली असणारी राज्यभरातील सर्व देवस्थाने त्यांचा लेखापरीक्षण अहवाल त्यांच्या संकेतस्थळावर प्रकाशित करतात; मात्र महाराष्ट्र वक्फ बोर्डाने मागील १७ वर्षे सरकारला लेखापरीक्षण अहवाल सादर केलेले नाहीत. दुर्दैवाची बाब म्हणजे याविषयी राज्य सरकारनेही वक्फ बोर्डाकडे विचारणा केलेली नाही. मागील काही वर्षांत वक्फ मंडळाने राज्यातील जमिनी लाटल्याच्या अनेक तक्रारी ज्या प्रकारे पुढे आल्या आहेत, ते पाहता हा सर्व प्रकार अतिशय गंभीर आहे. सरकारने याकडे वेळीच लक्ष द्यावे, यासाठी हिंदु विधीज्ञ परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड्. वीरेंद्र इचलकरंजीकर यांनी महाराष्ट्र सरकारकडे लिखित तक्रार केली आहे. याविषयी ॲड. इचलकरंजीकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस आणि अल्पसंख्याक विकासमंत्री मा. दत्तात्रय भरणे यांना पत्र लिहून वक्फ मंडळ बरखास्त करण्याची मागणी केली आहे.

महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाकडे सुमारे एक लाख एकर जमीन आहे. या बोर्डाला महाराष्ट्र सरकारकडून दरवर्षी निधी दिला जातो. कार्यालयीन खर्च, पदाधिकाऱ्यांच्या वाहनांसाठी डिझेल, कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी पैसे सरकारी तिजोरीतून दिले जातात. वक्फ बोर्डाच्या कायद्यातील अधिनियम १९९५ मध्ये दरवर्षीचे लेखापरीक्षण अहवाल सरकारला सादर करणे बंधनकारक आहे. त्याचा अभ्यास करून सरकारने त्यावर आदेश दिले पाहिजेत; मात्र महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडून वर्ष २००८ पासून ते आजपर्यंत एकही लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाला नसल्याची बाब माहिती अधिकाराच्या अंतर्गत प्राप्त झाली आहे. एकीकडे मंदिरांचा पैसा सरकारी योजनांसाठी वापरला जातो, तर दुसरीकडे वक्फ बोर्डाला सरकार दरवर्षी पैसे देते. वक्फ बोर्डाकडे इतकी जमीन येते कुठून? त्यामध्ये सातत्याने वाढ कशी होते? याची उत्तरे देण्याची वेळ आली आहे, असा प्रश्न ॲड. इचलकरंजीकर यांनी उपस्थित केला आहे.

महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाच्या कारभारात मुळीच पारदर्शकता नाही. त्या-त्या वर्षाचे लेखापरीक्षण झाल्यास पुढच्या वर्षी त्यात भ्रष्टाचार करायला वाव मिळत नाही. एकदम १० वर्षांचे लेखापरीक्षण करताना आकडे बदलता येतात, गायब करता येतात. ही बाब अत्यंत गंभीर आहे. वक्फ बोर्ड सरकारचा आदेश मानत नसतील, तर त्याच वक्फ बोर्ड कायद्यातील कलमांचा वापर करून हा बोर्ड बरखास्त करावा. ती ताकद सरकारकडे आहे. सर्वोच्च न्यायालय, तसेच अन्य न्यायालयांमध्ये असलेले लाखो खटले कोणत्या न्यायालयात आहेत? त्यांची सुनावणी कधी आहे? खंडपीठ आदींची माहिती संकेतस्थळावर दिली जाते. महाराष्ट्रातील वक्फ प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर मात्र त्यांच्या खटल्यांची माहिती दिली जात नाही, असे ॲड. वीरेंद्र इचलकरंजीकर यांनी निदर्शनास आणून दिले.

# राज्यात अंमली पदार्थ विक्रेत्यांविरोधात मकोका

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई – राज्यात अंमली पदार्थ विक्री करणाऱ्यांविरोधात मकोका अंतर्गत कारवाई करण्यात येईल, अशी माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी आज विधानसभेत दिली. ड्रग्स सेवन करणाऱ्यांविरोधात १५,८७३ गुन्हे दाखल करण्यात आले असून, १४,२३० जणांना अटक करण्यात आली आहे. तसेच, अंमली पदार्थ बाळगणे आणि वाहतूक करणाऱ्यांवर २,७३८ गुन्हे दाखल करून ३,६२७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. आतापर्यंत राज्यभरात ४,२४० कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त करण्यात आले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. शिवसेना आमदार दिलीप लांडे यांनी चांदिवली मतदारसंघातील घाटकोपर आणि साकीनाका पोलीस ठाणे हद्दीतील बेकायदेशीर गुटखा, गांजा, चरस विक्री तसेच ऑनलाईन लॉटरी व्यवसायाबाबत विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडली. या परिसरात महिलांना फिरणे मुश्कील होत आहे आणि पोलिसांकडून गुन्हेगारांना पाठीशी घातले जाते, असा आरोप करत फईम खान नावाच्या गुंडाकडून लहान मुलांचा ड्रग्स विक्रीसाठी गैरवापर होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. गृहराज्यमंत्री कदम यांनी उत्तर देताना सांगितले की, दहा कोटी रुपये किंमतीचा एमडी ड्रग्स साठा जप्त करून पाच जणांना अटक करण्यात आली आहे. राज्यात अमली पदार्थ विक्री करणाऱ्यांना पाठिशी घालणार नाही आणि अँन्टी-नार्कोटिक टास्क फोर्सची स्थापना करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. हिरानंदानी वसाहतीतील शैक्षणिक संकुल परिसरात जर अंमली पदार्थ विक्री होत असेल, तर तातडीने कारवाई केली जाईल, असे आश्वासन देत अन्न व औषध प्रशासन विभागाच्या (FDA) संबंधित अन्न सुरक्षा अधिकारी पदे दोन महिन्यांत भरली जातील, असेही त्यांनी सांगितले.

विजय वडेट्टीवार आणि अस्लम शेख यांनीही यावेळी संबंधित मुद्द्यांवर प्रश्न विचारले.




# उरणच्या हवेत सुधारणा

## नागरिकांना दिलासा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उरण : गेल्या दोन वर्षांपासून जागतिक व देशातील हवा प्रदूषणात उरणची अव्वल क्रमांकावर नोंद होऊ लागली होती. मात्र काही दिवसांपासून यामध्ये सुधारणा झाली असून शुक्रवारी हा हवा गुणवत्ता निर्देशांक ५९ अंकांवर होता. या अंकात सातत्याने सुधारणा होत आहे. त्यामुळे वातावरणही आल्हादायक झाले आहे.

वाढते हवा प्रदूषण, तापमान आणि आर्द्रता याचा येथील नागरिकांच्या शरीरावर हानिकारक परिणाम होऊ लागला आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून उरणमध्ये हवा गुणवत्ता निर्देशांक २०० ते ३०० च्या वर नोंदविण्यात येत होता. ही हवेची प्रदूषित मात्रा मानवी शरीरासाठी अतिशय हानीकारक आहे. बदलत्या वातावरणात वाढते तापमान आणि आर्द्रतेतही वाढ झाले आहे. याचा परिणाम येथील नागरिकांच्या शरीरावर परिणाम होत आहे.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024